# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. २१३२/२०२३/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.रमेश रामचंद्र अहिरे, जुना गंगापूर नाका ठक्कर रिटीट, अे टाईप गंगापुर रोड, नाशिक. जि.नाशिक. | परिरक्षण भूमापक झोडगे, नगर भूमापन अधिकारी मालेगांव, यांचे कार्यालय मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक. | नगर भूमापन अधिकारी, मालेगांव, ता.मालेगांव, जि.नाशिक. |

विवेचन

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ३०/११/२०२२ | ३०/११/२०२२ | ----- | १०/०२/२०२३ | १०/०२/२०२३ | १३/०३/२०२३ |

अपिलार्थी यांनी दि. १०/०४/२०२३ रोजीच्या अर्जान्वये " जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. " असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

२. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०१/०१/२००० ते दि.३०/११/२०२२ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

मौजे सौंदाणे ता.मालेगांव येथील सि.स.नं.५६, २४९ व २७९ ते नोंदी १)३९२ व २)४८१ तसेच सदर नोंदी लागल्याचे संबंधीत सर्व कागदपत्रके वारस हक्काने शासकीय कार्यलयातील कामकाजासाठी आवश्यक असल्याने. दि.२४/०१/२००५ चा तलाठी सौंदाणे या कार्यालयातील वारस दाखला (पत्नी सौ.विमल रमेश आहिरे).

३. या प्रकरणी अपिलार्थी यांनी दि.१०/०७/२०२४ रोजीचे लेखी निवेदन सादर केले असून त्यामध्ये, मौजे सौंदाणे ता.मालेगांव जि.नाशिक येथील सि.स.नं.५६, २४९ व २७९ चे स्वंयसुची धारिकेची फेरफार प्रकरणातील साक्षांकित प्रती नकला मला नगर भूमापन अधिकारी मालेगांव, ता.मालेगांव (नाशिक) यांचे कार्यालयाकडून दि.०५/०७/२०२४ रोजी प्राप्त झाल्या आहेत तरी. कृपया माझे अपिल अर्ज निकाली काढण्यात यावा अशी विनंती केली आहे.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

प्रस्तुतचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

स्थळ:- नाशिक

दिनांक:-

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

जावक क्र. आ-२८८३ 20 SEP 2024